# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** सत्र २०२४-२५ मध्ये मनपा शाळेतील विद्यार्थ्यांच्या संगीत विषयक
**{शिक्षण विभाग}** संकल्पना विकसित करण्याकरीता जाहिरातीद्वारे एकुण ७ संगीत शिक्षकांची मासिक मानधन रू. २५,०००/- मानधनावर तात्पुरती मुलाखतीद्वारे भरती करण्याबाबत.

मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेकडे नागपूर मनपा शाळांमध्ये सत्र २०२४-२५ मध्ये मनपा शाळातील विद्यार्थ्यांचे कलागुण विकसित करण्याकरीता ६ शाळांकरीता ७ संगीत शिक्षक असे पद तात्पुरत्या ११ महिन्याचे कालावधीकरीता भरती प्रक्रियेला मा. आयुक्तांनी दि. १७/०६/२०२४ ला मान्यता प्रदान केलेली आहे.

या ११ महिन्याचे तात्पुरत्या स्वरूपात ७ कंत्राटी शिक्षकांवर दरमहा रू. २५,०००/- मानधनाप्रमाणे एकुण (२५,००० X ७ X ११ = १९,२५,०००/-) इतका खर्च अपेक्षित आहे. संबंधित ७ कंत्राटी संगीत शिक्षकांच्या तात्पुरत्या स्वरूपात भरती प्रक्रियेकरीता बिंदुनामावली तपासुन मागासवर्ग विभागाकडून प्राप्त झाल्यानंतर मा. अति. आयुक्त (शहर) यांचे अधिनस्त जाहिरातीची प्रक्रिया व संपूर्ण भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी दि. १७/०६/२०२४ च्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्याबाबत विषय व ठरावाचे प्रारूप सादर केलेले आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 911/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 14/07/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार सत्र २०२४-२५ मध्ये मनपा शाळेतील विद्यार्थ्यांच्या संगीत विषयक संकल्पना विकसित करण्याकरीता जाहिरातीद्वारे एकुण ७ संगीत शिक्षकांची मासिक मानधन रू. २५,०००/- मानधनावर तात्पुरती मुलाखतीद्वारे भरती करण्याबाबत.

मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेकडे नागपूर मनपा शाळांमध्ये सत्र २०२४-२५ मध्ये मनपा शाळातील विद्यार्थ्यांचे कलागुण विकसित करण्याकरीता ६ शाळांकरीता ७ संगीत शिक्षक असे पद तात्पुरत्या ११ महिन्याचे कालावधीकरीता भरती प्रक्रियेला मा. आयुक्तांनी दि. १७/०६/२०२४ ला मान्यता प्रदान केलेली आहे.

या ११ महिन्याचे तात्पुरत्या स्वरूपात ७ कंत्राटी शिक्षकांवर दरमहा रू. २५,०००/- मानधनाप्रमाणे एकुण (२५,००० X ७ X ११ = १९,२५,०००/-) इतका खर्च अपेक्षित आहे. संबंधित ७ कंत्राटी संगीत शिक्षकांच्या तात्पुरत्या स्वरूपात भरती प्रक्रियेकरीता बिंदुनामावली तपासुन मागासवर्ग विभागाकडून प्राप्त झाल्यानंतर मा. अति. आयुक्त (शहर) यांचे अधिनस्त जाहिरातीची प्रक्रिया व संपूर्ण भरती प्रक्रिया राबविण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.